# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

**सभा व दप्तर कक्ष**

---

ज्ञानगंगा घरोघरी

# विद्वत परिषद बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 68 |
| स्थळ | : | **यश इन सभागृह**<br>**(Offline/Online)** |
| दिनांक | : | सोमवार 21 जुलै 2025 |
| वेळ | : | दुपारी 12 : 00 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

## 68वी विद्वत मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत परिषदेची 68 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने सोमवार, दि. 21 जुलै 2025 रोजी दुपारी 12.00 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू आणि संचालक, बहुविद्याशाखीय विद्याशाखा | सदस्य |
| 03 | मा. डॉ. नागार्जुन वाडेकर मा. संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा आणि संचालक, भाषा साहित्य व सांस्कृतिक अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| 04 | मा. डॉ. सुरेंद्र पाटोळे, मा. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 05 | मा. डॉ. संजीवनी महाले, मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 06 | मा. डॉ. चेतना कामळसकर, मा. संचालक, विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 07 | मा. श्री. माधव पळशीकर, संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 08 | मा. डॉ. माधुरी सोनवणे, संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 09 | मा. डॉ. जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा आणि मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास विद्याशाखा | सदस्य |
| 10 | मा. डॉ. प्रकाश बर्वे, उपग्रंथपाल, ज्ञानस्रोत केंद्र | सदस्य |
| 11 | मा. डॉ. लतिका गायकवाड, सहा. प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 12 | मा. डॉ. दयाराम पवार, प्रमुख विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र | सदस्य |
| 13 | मा. श्री. राजेंद्र वाघ, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 14 | मा. डॉ. नितीन ठोके, कृषी विज्ञान केंद्र | सदस्य |
| 15 | मा. डॉ. राजेंद्र विखे पाटील, अध्यक्ष व कुलपती, प्रवरा मेडिकल सायन्स संस्था मु.पो. लोणी, ता. रहाता. जि. अहिल्यानगर | सदस्य |
| 16 | मा. श्री. संजय वझे, कल्याण (प), जि. ठाणे | सदस्य |
| 17 | डॉ. संजय तांबट, पुणे — ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 18 | मा. डॉ. रश्मी रानडे, प्र-संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा | निमंत्रितसदस्य |
| 19 | मा. डॉ. कविता साळुंके, संचालक, ऑनलाईन एज्युकेशन विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 20 | मा. संचालक, ग्रामीण विकास उद्योजकता विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |
| 21 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग | निमंत्रित सदस्य |
| 22 | डॉ. मधुकर शेवाळे, संचालक, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन कक्ष आणि नियोजन व सुसुत्रीकरण केंद्र | निमंत्रित सदस्य |
| 23 | मा. दिलीप भरड | सदस्य-सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. श्री. विलास विष्णू शिंदे, आडगाव नाशिक | सदस्य |
| 02 | मा. श्री. मधुकर गवळी, मु.पो. उगाव, ता. निफाड. जि. नाशिक | सदस्य |
| 03 | डॉ. धनंजय बेळे, नाशिक | सदस्य |
| 04 | मा. श्री. महेश दाबक, आनंदनगर, नाशिक | सदस्य |
| 05 | मा. श्री. राजेश पांडे, शिवाजी नगर, पुणे | सदस्य |
| 06 | मा. डॉ. अजय भामरे, प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| 07 | मा. डॉ. संजय चाकणे, प्राचार्य, T.J. College, खडकी, पुणे | सदरय |
| 08 | मा. प्रा. डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | निमंत्रित सदस्य |
| 09 | मा. प्रा. डॉ. सज्जन थूल, प्र.संचालक, मूल्यमापन विभाग | निमंत्रित सदस्य |
| 10 | मा. श्री. अभिषेक भागवत, संचालक, विकासात्मक अभ्यास विद्याशाखा | निमंत्रित सदस्य |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

**68वी विद्वत परिषद बैठक**

## कार्यवृत्त

**सोमवार** 21.07.2025 **दुपारी** 12:00 **वाजता**

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 68.1.0 | | बैठकीसाठी ऑनलाईन\ऑफलाईन असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे विद्वत परिषदेचे सदस्य सचिव श्री. भरड यांनी स्वागत केले. |
| | | मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांनी बैठकीसाठी प्रत्यक्ष उपस्थित डॉ. राजेंद्र विखे पाटील सर, वझे सर तसेच ऑनलाईन उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.<br>विद्वत परिषदेच्या बैठकीला सुरुवात करण्यापूर्वी विद्यापीठाच्या प्रगतीबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिले.<br>विद्यापीठाचा वर्धापन दिन समारंभ 1 जुलै रोजी संपन्न झाला. ह्या दिवसाचे औचित्य साधून विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू मा. डॉ. राम ताकवले सरांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या दिवशी समाजातील विविध क्षेत्रांतील 5 व्यक्तींचा (रंगनाथ पठारे, विवेक सावंत, पद्मश्री पवार, अशोक कटारिया, पाठक सर) यशजीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.<br>शैक्षणिक प्रगतीबाबत विविध विद्याशाखांतर्गत विविध संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. त्यांचे पुढील काम संबंधित विद्याशाखांमध्ये सुरू आहे. जेएनपीटी यांचेशी सामंजस्य करारानुसार वाहनचालकांसाठीचा शिक्षणक्रम यावर्षापासून सुरू झालेला आहे. त्यांचेकडील 5000 ड्रायव्हर्सची नोंदणी झालेली आहे.<br>B.Sc. Fire Sefety ह्या शिक्षणक्रमाला DEB कडून मान्यता मिळाली आहे.<br>विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेशाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. पहिला टप्पा पार पडला आहे. दुसऱ्या टप्प्याची जाहिरात प्रसिद्ध होणार आहे.<br>महाज्ञानदिपचा एक टप्पा पूर्ण झाला आहे. IKS तसेच NEP2020 च्या निर्देशानुसारचे काम विद्यापीठाचे प्र-कुलगुरू करत आहे.<br>बारामती जिल्हा केंद्राची इमारत शासकीय खर्चातून अत्यंत देखणी सर्व सोयींयुक्त तयार झालेली आहे. विविध जिल्ह्यांमधून जिल्हा केंद्रासाठी जागा मिळण्याची प्रक्रिया सुरू आहे.<br>विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या आणि 30 दिवसांच्या आत परीक्षेचे निकाल लागले आहेत.<br>मा. पंतप्रधानांच्या 2047 रोजीच्या भारताच्या दूरदृष्टीवर आधारीत जगातील शालेय गुणवत्ता तपासणीसाठी 'Transforming School from Leadership' असा अंदाजे रु. दोन कोटी नऊ लाख रुपयांचा मोठा प्रोजेक्ट मा. कुलगुरूंनी वैयक्तिकरित्या ICSR ला सादर केला आणि एवढा मोठा प्रोजेक्ट पहिल्यांदाच या विद्यापीठाला मिळालाय. सर्व सन्माननीय सदस्यांनी मा. कुलगुरूंचे अभिनंदन केले. |

| | | |
|---|---|---|
| | | 'सायली फौंडेशन' यांनी दिव्यांगांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक अध्यापक ट्रेनिंग देण्यासाठी रु. 10 कोटी देणगी मंजूर केली. त्यांपैकी रु. 1 कोटी जमा केले आहे. यावर सन्माननीय सदस्य मा. विखे पाटील सरांनी अशाच प्रकारचे अध्यापक प्रोफेशनल क्षेत्रातही तयार व्हावेत यासाठीही विद्यापीठाने प्रयत्न करावेत असे सुचविले. प्रायोगिक तत्वावर शिक्षण क्षेत्रावर याचा प्रयोग करून पुढे प्रोफेशनल क्षेत्रात विचार करता येईल असे मा. कुलगुरूंनी विषद केले.<br>सन्माननीय सदस्य श्री. वझे सरांनी AI चे वाढलेले महत्व विषत करून त्याचा विद्यापीठात कसा उपयोग करून घेण्यासाठी आणि विद्यापीठ स्तरावर याचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित व्यक्तीची नेमणूक करावी असे सुचित केले. त्यावर विद्यापीठात AI Implementation Committee स्थापन झाली असून कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबीरही आयोजित करण्यात आले होते तसेच त्यावरील शिक्षणक्रम कसे असावे यावर काम सुरू आहे.<br>समाजातील विद्यापीठाची पत जाणून घेऊन वेगवेगळ्या संस्थांकडून विद्यापीठाला देणग्या मिळत आहेत. विद्वत परिषदेने या सर्व विषयांना मान्यता देऊन सहकार्य केल्यानेच विद्यापीठ प्रगती करीत आहे असे मा. कुलगुरुंनी विषद केले.<br>अशा विविध क्षेत्रांमधील विद्यापीठाची प्रगती ऐकून सर्व सन्माननीय सदस्यांनी समाधान व्यक्त केले आणि मा. कुलगुरूंचे अभिनंदन केले. |
| 68.2.0 | 68.2.1 | दि. 09 एप्रिल 2025 रोजी झालेल्या 67 व्या विद्वत परिषद बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.<br>**ठराव** – सदस्य सचिव श्री. भरड यांनी 67 व्या विद्वत परिषद बैठकीतील कार्यवृत्त यांनी वाचून दाखविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 68.2.2 | दि. 09 एप्रिल 2025 रोजी झालेल्या 67 व्या विद्वत परिषद बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल.<br>**ठराव** – सदस्य सचिव श्री. भरड यांनी 67 व्या विद्वत परिषद बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा सादर केला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 68.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 68.3.1<br>परीक्षा विभाग | **शैक्षणिक वर्ष 2025-26 चे शैक्षणिक वेळापत्रक मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक, अंतिम प्रवेशाची दिनांक, उद्‌बोधन सत्र (Induction Programme), समंत्रण सत्रे (Contact Session) कालावधी, गृहपाठ सादरीकरणाच्या तारखा, परीक्षा अर्ज सादर करण्याच्या तारखा, परीक्षेचा संभाव्य कालावधी इत्यादी बाबींच्या समावेशासह शैक्षणिक वर्ष 2025-26 चे शैक्षणिक वेळापत्रक मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** –विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक, अंतिम प्रवेशाची दिनांक, उद्‌बोधन सत्र (Induction Programme), समंत्रण सत्रे (Contact Session) कालावधी, गृहपाठ सादरीकरणाच्या तारखा, परीक्षा अर्ज सादर करण्याच्या तारखा, परीक्षेचा संभाव्य कालावधी इत्यादी बाबींच्या समावेशासह शैक्षणिक वर्ष 2025-26 चे शैक्षणिक वेळापत्रक सादर केले. सदर वेळापत्रकात ज्या शिक्षणक्रमांसाठी प्रकल्प अहवाल, मौखिक परीक्षा, नव्याने स्थापन झालेल्या व्यवसाय शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेच्या स्कील बेस शिक्षणक्रमांसाठी ह्या वेळापत्रकात थोडी लवचिकता असावी अशी सूचना मा. कुलगुरूंनी मांडली. तसेच वेगवेगळ्या संस्थांशी करण्यात आलेल्या सामंजस्य कराराअंतर्गतच्या शिक्षणक्रमांच्या (उदा. Vocational, Agniveer – 6 ठिकाणी 2600 विद्यार्थी) शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांना थोडा अधिकचा कालावधी देण्याची तरतूद असावी असा प्रस्ताव मांडला. |

| | | |
|---|---|---|
| | | सभेत सादर केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकास आणि मा. कुलगुरूंनी मांडलेल्या सुचनेस सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 68.3.2<br>शिक्षणशास्त्र<br>विद्याशाखा | **शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषद बैठक क्र. 65 दि. 30 मे 2025 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची बैठक क्र. 65 दि. 30.5.2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषदेने मान्य केलेल्या अभ्यासकेंद्र पुनर्मान्यता व नव्याने मान्यतेच्या नियमावलीला तसेच संमंत्रक पात्रता निकषांना मान्यता देऊन शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 68.3.3<br>स्कूल ऑफ<br>डिजिटल<br>एज्युकेशन | **दि. 27 जून 2025 रोजी आयोजित स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यते्स्तव सादर...**<br>**टिपणी** - स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन विद्याशाखेची बैठक दि. 27 जून 2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्त परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन विद्याशाखेचे चार प्रमाणपत्र शिक्षणक्रम जून 2025 पासून सुरू करण्यात आले आहेत. नव्याने Design करण्यात आलेल्या IBM Certificate Programme in Generative AI & Prompt Engineering – B.Arts, Certificate Programme in Generative AI & Prompt Engineering – B.Com, महाज्ञानदिपसाठीच्या English for Communications & Academic Skills, महाज्ञानदिपसाठी Accountancy & Taxation, पर्यावरण शिक्षण, Design Thinking, भारतीय दर्शन शास्त्राचा परिचय, AI for Teachers या शिक्षणक्रमांच्या विद्याशाखा परिषदेने मान्यता देण्यात आलेल्या Structure आणि सुचनांनुसार सादर केलेल्या इतिवृत्ताला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 68.3.4<br>आरोग्य विज्ञान<br>विद्याशाखा | **दि. 10 जून 2025 रोजी आयोजित आोग्य विज्ञान विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - आरोग्य विज्ञान विद्याशाखेची बैठक दि. 10 जून 2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** – आरोग्य विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषदेत एम.ए. योगशास्त्र शिक्षणक्रमाच्या प्रवेश, ब्रह्मकुमारी यांच्यामार्फत Dip. in Counselling and Mental Welbeing या नवीन शैक्षणिक धोरणानुसारच्या शिक्षणक्रम, इतर शिक्षणक्रमाच्या मान्य केलेल्या विषयांना आणि सोबत जोडलेल्या इतिवृत्ताला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 68.3.5<br>विज्ञान<br>विद्याशाखा | **दि. 03 जून 2025 रोजी आयोजित विज्ञान विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – विज्ञान विद्याशाखेची बैठक दि. 03 जून 2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – दिनांक 03 जून 2025 रोजी झालेल्या विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तातील सर्व विषयास मा. विद्वत परिषदेने खालील चर्चेनुसार सर्वानुमते मान्यता दिली आहे;<br>B.Sc. (Honours) (Physics), B.Sc. (Honours) (Chemistry), B.Sc. (Honours) (Mathematics), B.Sc. (Honours) (Botany), B.Sc. (Honours) (Zoology) हे सर्व शिक्षणक्रम 04 वर्ष कालावधीचे असतील. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या मार्गदर्शक तत्वानुसार |

| | | |
|---|---|---|
| | | हे नविन सुधारित शिक्षणक्रम शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून सुरु करण्यास व नजिकच्या काळात UGC-DEB मान्यतेस अर्ज सादर करण्यास मान्यता देण्यात आली.<br>त्यानुषंगाने सद्यस्थितीत सुरु असलेल्या मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्रावर (LSCs) UGC Regulation 2020 अधिनियमातील अटी व शर्तीच्या अधीन राहून नविन आणि सुधारित 04 वर्ष कालावधीचे सर्व B.Sc. (Honours) शिक्षणक्रम Mapping मध्ये शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून प्रवेशासाठी उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 68.3.6<br>व्यवसाय शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा | **व्यवसाय शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेची बैठक दि. 16 एप्रिल 2025 रोजीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – व्यवसाय शिक्षण कौशल्य विकास विद्याशाखेची बैठक दिनांक 16 एप्रिल 2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदसमोर मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** – व्यवसाय शिक्षण कौशल्य विकास विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषदेने Certificate Program Bee Keeping, Certificate Program in Financial Literacy, Certificate Program on Logistic Management, Certificate Program on Container Management, Certificate Program for Customs House Supervisor, Certificate Program in Industrial Hydraulics, Certificate Program in Repair and Maintenance of Heavy Earthmoving Machines – Evxcavators आणि Diploma in Fleet Management of Construction & Maining Equipment या सर्व शिक्षणक्रमांच्या आराखड्याला दिलेल्या मान्यतेला विद्वत परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 68.3.7<br>संगणक शास्त्र विद्याशाखा | **संगणकशास्त्र विद्याशाखेच्या दि. 5 जून 2025 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – संगणकशास्त्र विद्याशाखेची विद्याशाखा परिषदेची बैठक दिनांक 5 जून 2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदसमोर मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** – दि. 5 जून 2025 रोजी झालेल्या संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेची बैठकीच्या इतिवृत्तास विद्वत परिषदेत मान्यता देण्यात आली. त्यात इतर मान्यतांबरोबरच पुढील गोष्टींचा समावेश आहे<br>1. NEP2020 नुसार राबवावयाच्या B.Sc. (Hons) (Data Science), BCA आणि B.Sc. (Industrial Automation) शिक्षणक्रमांच्या शिक्षणक्रम संरचना आणि पाठ्यक्रमाला तसेच अध्ययन साहित्य विकसनासाठीच्या लेखक-संपादकांच्या यादीस मान्यता देण्यात आली. तसेच सदर शिक्षणक्रमांच्या Program Proposal Form (PPF), Program Development Form (PDF) and Program Project Report (PPR) या प्रपत्रांना मान्यता देण्यात आली.<br>2. दि. 5 जून 2025 रोजी झालेल्या संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेत BCA (P32), B.Sc. (Industrial Science) (P45, P133), B.B.A. (Business Process Management) (P137, P145, P146), B.Sc. (Computer System Administration) (P134) या शिक्षणक्रमाची मान्यता रद्द करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयास विद्वत परिषदेत मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | 3. मायक्रोक्रेडेन्शिअलच्या संकल्पनेमध्ये याहीपेक्षा कमी कालावधीत घेतलेल्या ज्ञानासाठी श्रेयांक जमा करण्याची तरतूद असून याप्रकारे श्रेयांक मिळविण्याची सोय उपलब्ध होत असताना एक महिन्याच्या प्रमाणपत्र शिक्षणक्रमाला मान्यता देण्यात काही अडचण नाही अशी चर्चा होऊन Certificate in CDR Analysis and Cybercrime Investigation आणि Certification in Mobile and Cyber Forensics प्रत्येकी एक महिना कालावधी असलेल्या प्रमाणपत्र शिक्षणक्रमांना विद्वत परिषदेने मान्यता दिली. |
| | 68.3.8<br>मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा | **मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या दि. 18 जुलै 2025 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – मानव्यविद्या विद्याशाखेची विद्याशाखा परिषदेची बैठक दिनांक 18 जुलै 2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – मानव्यविद्या विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तातील एम.ए. इंग्रजी ऑनलाईन, समुदाय प्रतिबद्धता : शहरी व ग्रामीण विकास पदविका, मानसशास्त्रीय समुपदेशन पदविका यांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. परंतु राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार वाढलेली अभ्यासक्रमांची संख्या, संमंत्रण सत्रांची संख्या यानुसार अभ्यासकेंद्रांचा हिस्सा वाढवण्याबाबतचा विषय मानधन समितीकडे वर्ग करण्यात यावा. मानधन समितीने यावर घेतलेल्या निर्णयास मा. विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरू अहवाल स्विकारतील असा ठराव संमंत करण्यात आला. |
| 68.4.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय** |
| | 68.4.1<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषदेच्या दि. 11 जुलै 2025 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – दि. 11 जुलै 2025 रोजी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद आयोजित करण्यात आली होती. त्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विदवत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषदेत चर्चा झालेल्या विषय क्र. 64.5 बी-1/एफ-182/2025/15 आणि विषय क्र. 66.01 बी-1/एफ-186/2025/01 सेवांतर्गत बी.एड. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना समाजसेवा प्रात्यक्षिका अंतर्गत नवीन प्रात्यक्षि समाविष्ट करणेबाबत तज्ज्ञ सल्लागार समितीकडे विषय पाठविण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला. मा. कुलगुरुंनी NCTE च्या नवीन धोरणानुसार 1 वर्ष, 2 वर्ष सेवांतर्गत बी.एड. आणि 4 वर्षाचे ITEP यांचे निकष तपासून त्याप्रमाणे अंमलबजावणी करताना त्याची संरचना थोडी लवचिक करता येईल का असा अभ्यास करता येईल. अभ्यास समिती सदस्यांबाबत मा. कुलगुरू यांना अवगत करण्यात यावे असे निर्देशित केले. या विषयासंदर्भात प्रात्यक्षिकांची संख्या ठरवावी. प्रात्यक्षिकांबाबतची हस्तपुस्तिका तयार करण्यात यावी अशी सूचना केली. या विषयाला तत्वत: मान्यता देण्यात आली. तसेच हस्तपुस्तिका तयार झाल्यानंतर विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी पुन्हा ठेवण्यात यावी. त्यानंतर या विषयाला मान्यता देण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या.<br>शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी GD Art मधून पदवी व पदवी समकक्ष पात्रताधारक नियमित मान्यताप्राप्त पदावरील शिक्षकास समकक्षता तपासून प्रवेश देता येईल असा निर्णय देण्यात आला.<br>विद्याशाखा परिषदेने प्रस्तावित केलेल्या Brain Based Learning प्रमाणपत्र शिक्षणक्रम ऐवजी जगभरातून Cognitive Learning ह्या संकल्पनेवर आधारित संरचना केलेली असते. त्याचा |

| | | |
|---|---|---|
| | | आधार घेऊन Cognitive Learning मधील संकल्पनेच्या आधाराने हा शिक्षणक्रम विकसित करावा अशी सूचना करण्यात आली.<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या वतीने 2003 पासून देण्यात येणारे डॉ. मधुभाई बुच कृतज्ञता पुरस्कार, डॉ. रविंद्र दवे प्रेरणा पुरस्कार, डॉ. आनंद वास्कर उत्कृष्ट शिक्षण ग्रंथ पुरस्कार देण्यासाठी पूर्वीच्या जमा केलेल्या रु. 3 लक्ष निधीमध्ये विद्यापीठाकडून रुपये 7 लक्ष निधी जमा करून एकत्रित रुपये 10 लक्ष रुपयांच्या वार्षिक व्याजातून 5 सप्टेंबर शिक्षकदिनी किंवा विद्याशाखेच्या सोयीनुसार पुरस्कार देण्यात यावे. सदर पुरस्कार हे शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे न राहता विद्यापीठाचे पुरस्कार म्हणून उल्लेख केला जाईल. पुरस्कारासाठीचे काम विद्याशाखेमार्फत केले जाईल. या संकल्पनेचे सर्व सन्माननीय सदस्यांनी स्वागत करून मान्यता प्रदान केली.<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेने मान्य केलेल्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. |
| | 68.4.2<br>वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा | **वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अंतर्गत झालेल्या विद्याशाखा परिषदेची बैठक दि. 18 जुलै 2025 रोजी पार पडली. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** – दि. 18-जुलै-2025 रोजी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या बैठकीत पुढीलविषयांसहीत विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.<br>1. BA Facility Services & Management या शिक्षणक्रमाची तज्ज्ञ सल्लागार समितीचे इतिवृत्त, अभ्यासकेंद्र समंत्रक<br>2. MBA Cooperative Management (Specilization) तज्ज्ञ सल्लागार समितीचे इतिवृत्त<br>3. BBA Accounting & Mangement या शिक्षणक्रमातील सेमिस्टर 3 मधील एका विषयामधील बदल<br>4. पतसंस्था व्यवस्थापन पदविका तज्ज्ञ सल्लागार समितीचे इतिवृत्त<br>5. MBA Online तज्ज्ञ सल्लागार समितीचे इतिवृत्त<br>6. M.Com. (M117) Field Project, Research Project, यांच्या मूल्यांकनाबाबतची मान्यता<br>7. BBA Port Management (BBA PM) – सहा सेमिस्टर – वाढवण बंदरासाठी पदवी शिक्षणक्रम सुरू करण्याची मान्यता तसेच (Customes Clearance and Fraeight Documentation, Warehousing and Inventory Mangement, Port Termainal Operation Management, Ship Chandling and Supply Chain Management) चार प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करण्याची मान्यता<br>8. BBA – Event Management विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त<br>विद्याशाखा परिषदेने वरील सर्व विषयांना मान्यता देऊन सदर विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विदवत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषद बैठक दि. 18 जुलै 2025 रोजी झालेल्या बैठकीत परिषदेने मान्य केलेल्या वरील विषयांसहीत इतर विषयांच्या इतिवृत्तास मा. विद्वत परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते मान्यता दिली. |
| | 68.4.3<br>संगणक शास्त्र विद्याशाखा | **संगणकशास्त्र विद्याशाखा अंतर्गत झालेल्या विद्याशाखा परिषदेची बैठक दि. 18 जुलै 2025 रोजी पार पडली. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** – दि. 18-जुलै-2025 रोजी संगणक शास्त्र विद्याशाखेच्या बैठकीत संगणक विद्याशाखा परिषदेने मान्यता दिलेल्या Bachelor of Computer Applications (BCA), ऑनलाईन Master |

| | | |
|---|---|---|
| | | of Computer Applications (MCA) या शिक्षणक्रमाच्या संरचना, पाठक्रम व अध्ययन साहित्य निर्मितीचे विषय मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी सादर....<br>**ठराव** – दि. 18 जुलै 2025 रोजी झालेल्या संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदच्या बैठकीच्या इतिवृत्तास विद्वत परिषदेत मान्यता देण्यात आली. त्यात इतर मान्यतांबरोबरच ऑनलाईन Bachelor of Computer Applications (BCA) आणि ऑनलाईन Master of Computer Applications (MCA) या शिक्षणक्रमाच्या संरचनेस, त्यातील अभ्यासक्रमांच्या पाठ्यक्रमांना, तसेच अध्ययन साहित्याची निर्मिती करण्यासाठीच्या कार्यपद्धतीस विद्वत परिषदेत मान्यता देण्यात आली.<br>ऑनलाईन शिक्षणक्रमांचे मूल्यमापन, ऑनलाईन अभ्यासक्रमांचे मूल्यमापन यांचा तपशील व मूल्यमापन पद्धतीचे तपशील ठरविण्याचे काम परीक्षा विभागाचे असल्याने साठी परीक्षा मंडळ बैठकीत निर्णय घेण्यासाठी परीक्षा विभागाला याबाबत प्रस्ताव देण्यात यावा असा निर्णय विद्वत परिषदेत घेण्यात ला.विद्यापीठ स्तरावर समिती नेमावी व त्याची मानक कार्यपद्धती (SOP) तयार करण्याची शिफारस विद्वत्त परिषदेला करण्यात यावी असे ठरले.<br>वरील सर्व ठरावास मा. विद्वत परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 68.4.4<br>विद्यापीठ संशोधन समिति | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ संशोधन समितीतर्फे तयार करण्यात आलेल्या Ph.D. Ordinance सुधारणा मा. विद्वत परिषदेच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ संशोधन समितीतर्फे YCMOU Ph.D. Ordinance 2023 तयार करण्यात आला होता. परंतु विद्यापीठ अनुदान आयोग यांचेसोबत झालेल्या Review Committee Meeting मध्ये Ph.D. Regulation 2022 च्या आधारे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार Ordinance मध्ये सुधारणा करण्यात आल्या. सदर सुधारित Ordinace ला मा. विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरूंनी मान्यता दिली आहे. सदर मान्यता मा. विद्वत परिषदेच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर....<br>**ठराव** – विद्यापीठ अनुदान आयोग यांचेसोबत झालेल्या Review Committee Meeting मध्ये Ph.D. Regulation 2022च्या आधारे अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आहे होते. त्यानुसार Ordinance मध्ये सुधारणा करण्यात आल्या. सदर Ordinace आता UGC च्या Regulations प्रमाणे करण्यात आल्याने सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली.<br>विद्यापीठाच्या पीएच.डी. शिक्षणक्रमाच्या नियमावलीत तसेच Working Ordinance मध्ये दुरुस्ती करण्यात आली. सुधारीत Working Ordinance ला शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेने मान्यता दिली होती. या विषयाला मान्यता देताना हा जरी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेने मान्य केला असला तरी तो इतर विद्याशाखांच्या पीएच.डी. शिक्षणक्रमाशीही संबंधित असल्याने यापुढे ज्या ज्या विद्याशाखांमार्फत पीएच.डी. शिक्षणक्रम राबविण्यात येतील त्यांना सुधारीत Working Ordinance लागू असेल असा निर्णय होऊन या विषयाला विद्वत परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |

**अध्यक्ष**
**विद्वत परिषद**

**सदस्य सचिव**
**विद्वत परिषद**